रॉनची मोठी कामगिरी

लेखक: **रोझ ब्लू व कोरिन जे. नाडेन**

चित्रे व सजावट: **डॉन टेट**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**



लेक सिटी येथील सार्वजनिक वाचनालयात जाऊन विमाने आणि अंतराळ या विषयावरील पुस्तके वाचणे रॉनला फार आवडत असे. स्वतःच्या नावावर पुस्तके घरी नेण्याची त्याची आता तयारी आहे. परंतु, दक्षिण कॅरोलिना राज्यातील १९५० च्या वातावरणात पुस्तके घरी नेण्यासाठी रॉनला स्वतःचे कार्ड मिळणे म्हणजे साधी गोष्ट नव्हती, ती एक मोठीच धीराची कामगिरी होती. रॉन मॅकनैर च्या शांततामय विरोधाच्या प्रत्यक्ष अनुभवावर आधारित अशी ही एक स्फूर्तीदायक कहाणी आहे. मोठा झाल्यावर रॉन एक शास्त्रज्ञ आणि अंतराळवीर बनला.

रॉनची मोठी कामगिरी

लेखक: **रोझ ब्लू व कोरिन जे. नाडेन**

चित्रे व सजावट: **डॉन टेट**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**

"रॉन, आज तू लवकर उठला आहेस. कसली घाई आहे?" रॉनच्या आईने विचारले. "आता नाश्ता करायला ये. मी ओटमील बनवले आहे."

"नाही आई, मला बाहेर जायचे आहे. आज सकाळी मला काम आहे," आपले बूट बांधता बांधता रॉन म्हणाला.

" तुला नेहमीच काहीतरी काम असते! निदान जेवायच्या वेळेपर्यंत तरी घरी ये," त्याची आई हसत हसत म्हणाली.

रॉन ९ वर्षांचा होता. त्या दिवशी सकाळी घरातून निघताना त्याच्या डोक्यात एक कल्पना होती. तो बरेच दिवस त्याचा विचार करत होता. दक्षिण कॅरोलिना राज्यातील उन्हाळ्यातील हा एक सुरेख दिवस होता. रॉनने निळ्या आकाशाकडे डोळे भरून पाहिले.

कधीतरी तो देखील विमान घेऊन या निळ्या आकाशात जाईल, असा त्याने विचार केला. मोठा झाल्यावर त्याला वैमानिक बनायचे होते. पण आज मात्र त्याच्या डोक्यात निराळाच विचार होता– आणि तो फार महत्त्वाचा होता.

रॉन रस्त्यावरून घाईघाईने चालला होता. त्याला उशीर होऊन चालणार नव्हते.

“ए रॉन!” किराणा दुकानाच्या मालकाने त्याला हाक मारली. “अगदी वेळेवर आला आहेस! मी आताच हे डोनट बाहेर काढले आहेत.”

“सुप्रभात, डग्लस काका,” रॉन म्हणाला. “धन्यवाद. पण आता मला कुठेतरी पोचायचे आहे.” आणि रॉन पुढे चालत राहिला.





शाळेसमोरून जाताना रॉनला त्याचा मित्र कार्ल बास्केटबॉलचा सराव करताना दिसला.

“बरं झालं, तू आलास ते!” कार्ल ओरडून म्हणाला.

“अरे कार्ल, मला खेळायला आवडलं असतं रे, पण मला एक महत्त्वाचं काम आहे,” रॉनने त्याला चालता चालता उत्तर दिले.



“उन्हाळ्याच्या सुट्टीत बास्केटबॉल पेक्षा काय महत्त्वाचं असणार?” कार्ल म्हणाला. “चेष्टा करतोस का?”

रॉन हसला. त्याला बास्केटबॉल खेळायला आवडत असे. पण आज नाही. आजचा दिवस फारच महत्त्वाचा होता. रॉन पुढे चालत राहिला.

लेक सिटीच्या सार्वजनिक वाचनालयाशी पोचल्यावर रॉन थांबला. त्याला इथेच जायचे होते. भरभर चालल्यामुळे त्याला घाम आला होता. शिवाय त्याला थोडीशी भीतीही वाटत होती. त्याने एक मोठा श्वास घेतला, मान वर उचलली, आणि आत गेला.

आजच्या दिवसात वाचनालयात येणाऱ्या लोकांसाठी सर्व तयारी करण्यात श्रीमती स्कॉट गुंतल्या होत्या. वाचनालयाची प्रमुख या नात्याने सर्व काही व्यवस्थित आहे हे पाहणे हे त्यांचे काम होते. वाचनालयातील पहिला वाचक आत येताना त्याचे स्वागत करण्यासाठी त्यांनी वर पाहिले. रॉन आत येताना पाहून त्यांनी एक स्मितहास्य केले. तो त्यांचा आवडता वाचक होता. रॉनने त्यांच्याकडे पाहून हात हलवला आणि तो थेट पुस्तकांच्या शेल्फ कडे गेला.



काही पुस्तके शोधायला रॉनला थोडा वेळ लागला. त्याच्यासारख्या मुलांची चित्रे असलेली पुस्तके तो नेहमी शोधत असे. पण ते तसे कठीण होते. शेल्फवर कृष्णवर्णीय मुलांसंबंधी फारशी पुस्तके नव्हती.

अखेर रॉनला विमानासंबंधी काही पुस्तके सापडली. ती पुस्तके घेऊन तो बाहेरच्या टेबलाकडे निघाला. रॉन थोडासा घाबरला होता आणि त्याच्या हाताला घामही आला होता. पण आज काय करायचे हे त्याने ठरवले होते. श्रीमती फिल्डींग नेहमी वाचनालयात येत असत, त्यांनी रॉनला थांबवले. “रॉन, तुझी पुस्तके दे माझ्याकडे, मी माझ्या नावावर घेऊन तुला देते,” त्या हळूच म्हणाल्या.

“नाही, धन्यवाद, मावशी,” रॉनने उत्तर दिले. “पण आज हे सर्व मी स्वतःच करणार आहे.”

“अरे, पण… ” त्या म्हणू लागल्या.

रॉन तोपर्यंत बाहेरच्या टेबलाकडे चालूही लागला होता. त्याने आपली पुस्तके टेबलावर ठेवली.

“मला ही पुस्तके घरी न्यायची आहेत,” रॉन म्हणाला.

टेबलामागच्या बाईंनी त्याच्याकडे पाहिलेही नाही. रॉनला वाटले, त्यांनी माझे बोलणे ऐकले नाही का?

त्यानंतर काय करायचे ते रॉनला माहित होते.





त्याने टेबलावर उडी मारली. तो गंभीरपणे बोलत होता हे टेबलामागच्या बाईंना त्याला समजावून द्यायचे होते.

तो शांतपणे म्हणाला, “मला ही पुस्तके घरी न्यायची आहेत.”

सुरुवातीला टेबलामागच्या बाई आणि श्रीमती स्कॉट एकमेकींकडे पाहू लागल्या. “रॉन, तुला माहीतच आहे की तू पुस्तके घरी घेऊन जाऊ शकत नाहीस,” श्रीमती स्कॉट म्हणाल्या. “तू इथे बसून पुस्तके वाचू शकतोस. तसाच नियम आहे. केवळ गोरे लोकच पुस्तके घरी नेऊ शकतात.”

रॉनने शांतपणे दोघींकडे पाहिले. पण तो आपले म्हणणे सोडायला तयार नव्हता.

“मी नेहमी इथे बसूनच वाचतो. पण आज मला ती घरी न्यायची आहेत,” रॉन म्हणाला.

श्रीमती स्कॉट आणि टेबलामागच्या बाईंना काय करावे सुचेना. रॉन टेबलावरून खाली उतरायला तयार नव्हता. वाचनालयातील लोक एकत्र जमून काय चालले आहे ते पाहू लागले. अखेर, टेबलामागच्या बाईंनी लेक सिटीच्या पोलिसांना फोन लावला.

दोन पोलीस लगेच हजर झाले.

त्यातला एकजण म्हणाला, “बाळ, कोणाला तरी ही पुस्तके त्यांच्या नावावर घेऊ देत. तुला तर नियम माहित आहे.”

पण रॉनने नुसतीच मान हलवली - तो आपले म्हणणे सोडायला तयार नव्हता.



श्रीमती स्कॉटनी रॉनच्या आईला फोन लावला. श्रीमती मॅकनैर लवकरच वाचनालयात पोचल्या. त्या रॉनला म्हणाल्या, “बाळ, तुला काय वाटते ते मला माहित आहे. पण तुला नियम तर पाळावेच लागतील.”

रॉन आईला म्हणाला, “हे नियम चुकीचे आहेत. म्हणून मी ते पाळणार नाही. हे नियम रास्त नाहीत. इतर सर्वांप्रमाणेच मला पुस्तके घरी का नेता येत नाहीत?”

यावर कोणीच काही उत्तर दिले नाही- टेबलामागच्या बाईंनी नाही, श्रीमती स्कॉटनी नाही किंवा पोलिसाने देखील नाही. रॉनची आईदेखील काहीच बोलली नाही.

श्रीमती स्कॉटनी रॉनकडे पहिले. आतापर्यंत कितीतरी वेळा रॉन वाचनालयात येऊन टेबलापाशी बसून अनेक तास निरनिराळी पुस्तके वाचत असे याची त्यांना आठवण झाली. तो वाचनालयातील उत्तम वाचक होता. त्याच्यासाठी काय करायला हवे ते त्यांना माहित होते.



श्रीमती स्कॉट आपल्या कार्यालयात गेल्या आणि काहीतरी लिहू लागल्या.

त्या काय लिहीत असतील याचा रॉन विचार करू लागला.

श्रीमती स्कॉट परत आल्या आणि त्यांनी रॉनच्या हातात वाचनालयाचे कार्ड दिले. त्याच्या नावाचे कार्ड!

रॉनने श्रीमती स्कॉट यांच्याकडे पहिले आणि त्याच्या चेहऱ्यावर हसू झळकले. त्याने टेबलावरून जमिनीवर उडी मारली, तेव्हा त्यादेखील हसत आहेत असे त्याला वाटले.

“मला ही पुस्तके घरी न्यायची आहेत,” आपले कार्ड पुढे करून रॉन टेबलामागच्या बाईंना म्हणाला.

बाईंनी त्याचे कार्ड घेतले आणि पुस्तकांच्या मागच्या पाकिटातील कार्डावर शिक्के मारले. “ही दोन आठवड्यात परत आणावी लागतील,” त्या म्हणाल्या.



"धन्यवाद!" रॉन हसून म्हणाला. पुस्तकांचा गठ्ठा हातात घेऊन त्याने आईचा हात धरला. ते दोघे मिळून चालत घरी निघाले. केव्हा एकदा आपल्या खोलीत जातो...



आणि पुस्तकाचे पान उघडतो असे
रॉनला झाले होते...

रॉन मॅकनैर नावाचा हा मुलगा मोठा झाल्यावर, त्याने लहानपणी स्वप्न पहिले होते, त्याप्रमाणे तो विमाने चालवू लागला. तो अंतराळवीर बनला. लेक सिटीतील लोकांना आजही त्याची आठवण आहे. प्रत्येक वेळी वाचनालयात गेले की त्यांना त्याची आठवण येते. २३४, मेन रोड येथे लाल विटांच्या भिंती असलेली एक खास इमारत आहे. मुलांच्या वाचनकक्षातील भिंतींवर एका मोठ्या झाडाखाली मुले पुस्तके वाचत असलेली, आणि आकाशात उपग्रह नेणारे एक यान उडत असलेली चित्रे रंगवली आहेत.

वाचनालयात कोणालाही वाचनालयाचे कार्ड बनवून पुस्तके घरी नेता येतात. लहानग्या रॉन मॅकनैरचे एक स्वप्न होते. १९५९ सालच्या त्या दिवसापासून ते खरे होण्यास सुरुवात झाली. त्याच्यामुळेच, आता अनेक तरुणांना स्वप्ने पाहण्याची संधी मिळाली आहे.

अंतराळवीर रॉन मॅकनैर यांनी एकदा मुलांच्या एका गटाला सांगितले होते, "तुम्ही जर धोका पत्करायला तयार असाल, तरच तुम्ही जिंकू शकता. तुम्ही गरुड आहात, पंख पसरा आणि आकाशाकडे झेप घ्या."

अनेक वर्षांपूर्वी दक्षिण कॅरोलिना राज्यातील लेक सिटी येथे रॉन मॅकनैर हिरो बनला. त्यांनतर १९८६ मध्ये अंतराळवीर रॉन मॅकनैर परत एकदा हिरो झाला. २८ जानेवारी रोजी 'चॅलेंजर' या यानाचा स्फोट झाला आणि त्यातील सर्वजण मरण पावले. लेक सिटीतील सार्वजनिक वाचनालय अंतराळवीर रॉन मॅकनैर यांच्या स्मृतीला वाहिलेले आहे.

रॉन मॅकनैर यांच्या आयुष्यातील एका खऱ्या प्रसंगावर आधारित असलेली ही एक काल्पनिक कथा आहे. ही कथा अनेक प्रकारांनी सांगण्यात आली आहे. वर दिलेली कथा रॉनच्या आईची आणि दक्षिण कॅरोलिनातील फ्लोरेन्स कौंटी वाचनालय प्रशासनाच्या संचालकांच्या प्रशासकीय सहाय्यक ग्लोरिया विल्सन तसेच लेक सिटीच्या शालेय शिक्षण प्रमुख ग्लोरिया तिसडेल यांची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन लिहिली आहे. ही स्फूर्तिदायक कथा लिहिण्यासाठी मदत केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. रॉन आणि श्रीमती मॅकनैर यांचा अपवाद वगळता गोष्टीतील इतरांची नावे काल्पनिक आहेत.